महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, कोल्हापूर विभाग, विभागीय कार्यालय, मध्यवर्ती बसस्थानकाशेजारी, न्यू शाहूपुरी, कोल्हापूर - ४१६००१ दूरध्वनी क्रमांक ०२३१-२६५०९७५ ई-मेल : klpest@gmail.com

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, कोल्हापूर विभागामध्ये खालील पदासाठी मानद तत्त्वावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | समुपदेशक (COUNSELLOR) एकूण ०३ जागा. |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी (M.S.W.) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी (M.A.Psychology) अधिक समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदविका (Advance Diploma in Psychology) |
| अनुभव | समुपदेशन क्षेत्रातील शासकीय / निम-शासकीय / मोठ्या खासगी संस्थांमधील किमान ०२ वर्षांचा अनुभव. |
| इतर अटी व शर्ती | रा. प. महामंडळाच्या कोल्हापूर विभागामध्ये ०३ समुपदेशकांची मानद तत्त्वावर नेमणूक करण्यात येईल व त्याकरिता मासिक मानधन रु. ४०००/- देण्यात येईल. प्रथम १ वर्षासाठी सदर पदी मानद तत्त्वावर नेमणूक देण्यात येईल. सदर काळात केलेल्या कामाचा आढावा घेऊन पुढे सदर नेमणूक चालू ठेवायची किंवा नाही हे ठरविण्यात येईल. |
| कर्तव्य | रा. प. महामंडळातील कर्मचाऱ्यांचे विशेषतः चालक कर्मचाऱ्यांमध्ये समुपदेशनाद्वारे मानसिक ताणतणावाचे निवारण करणे, त्यांच्याशी वैयक्तिक संवाद साधून, अडीअडचणी समजावून घेऊन वैयक्तिक पातळीवर निराकरण करणे व आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचाराची गरज निदर्शनास आणून देणे, तसेच आगारास महिन्यातून किमान ०३ वेळा भेटी देणे. |
| नेमणूकीचा कालावधी | सदर नेमणूक निव्वळ मानद तत्त्वावर असून नेमणुकीचा कालावधी एक वर्ष राहील. आवश्यकता वाटल्यास समुपदेशकाचा कार्यकाल विचारात घेऊन नेमणुकीचा कालावधी वाढविण्यात येईल. सदर नियुक्ती मानद तत्त्वावर असल्याने रा. प. महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार / हक्क अर्जदारास / समुपदेशकास नसतील. तसेच सक्षम प्राधिकारी / नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| अर्ज करण्याची पद्धत | वरील अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवाराने फुलस्केप पेपरवर अर्ज टंकलिखित करून स्वतःचा फोटो स्वतःच्या सहीसह त्यावर चिटकवावा व अर्जासोबत शाळा सोडल्याबाबतचा दाखला, सर्व शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र, गुणपत्रक व अनुभवाचा दाखला (प्रमाणित सत्यप्रतीसह) जोडावा. सदर अर्ज दि. ३१/०७/२०२४ रोजीपर्यंत खालील पत्त्यावर पोहोचेल, या बेताने पाठवावा. याबाबत अधिक माहितीसाठी विभाग नियंत्रक, रा. प. कोल्हापूर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. |
| पत्ता | विभाग नियंत्रक, म. रा. मा. प. महामंडळ विभागीय कार्यालय, मध्यवर्ती बसस्थानकाच्या शेजारी, न्यू शाहूपुरी, कोल्हापूर ४१६००१. |

(शिक्का) सही/- विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, कोल्हापूर विभाग